# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१/२२६९०६०२/२२६४११५०/२२६४११५१ फॅक्स - २२६९ ०००७.

E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Website:www.dtemaharashtra.gov.in

प्रवेशासंबंधी महत्वाची सूचना

जा. क्र. : १०/एडीएम/प्रमाणपत्रे/२०१९/ ४८७

दिनांक : 10 MAY 2019

**शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील तांत्रिक पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रे**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस. एस.सी. पदविका अभ्यासक्रम, प्रथम वर्ष पोस्ट एच. एस. सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँन्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून करण्यात येतात. त्यासाठी अर्ज करतांना सुविधा केंद्रांवर कागदपत्रे पडताळणीच्यावेळी प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या आवश्यक त्या प्रकरणी लागू असणारी खालील प्रमाणपत्रे सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त करुन घेऊन ती तयार ठेवण्याबाबत प्रवेशोच्छुक उमेदवारांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

१. जात/जमात/सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्ग प्रमाणपत्र (Caste/Tribe/SEBC Certificate ) (सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)

२. जात/जमात/सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्ग वैधता प्रमाणपत्र (Caste/Tribe/SEBC Validity Certificate)(सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले).

पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या वेळी जात/जमात/एसईबीसी वैधता प्रमाणपत्र बंधनकारक नाही. आरक्षित जागेवरील मागासवर्गीय उमेदवाराचा प्रवेश त्याच्या जात /जमात / एसईबीसी प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधीन असेल. प्रथम किंवा व्दितीयवर्षातील राखीव जागेवर प्रवेश मिळालेल्या मागासवर्गीय उमेदवारास प्रवेश मिळाल्यापासुन एक महिन्याच्या आत जात/जमात/एसईबीसी प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी संबधित जात/जमात/एसईबीसी पडताळणी समितीकडे योग्य भरलेला अर्ज सादर करावा लागेल. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवार प्रवेशित शैक्षणिक वर्षामध्ये जात/जमात/एसईबीसी वैधता प्रमाणपत्र जमा करण्यास अपयशी ठरल्यास तो/ती पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेशासाठी पात्र होणार नाही. तसेच शिष्यवृत्तीचा दावा करण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकरणांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

३. शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.१२.०२.२०१९ नुसार खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)

४. शासन, महिला व बाल विकास विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दि. ०२.०४.२०१८ नुसार अनाथ प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)

५. नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate valid up to 31 March 2020 ) (अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ) [राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांचा अधिवास महाराष्ट्र राज्यात असला तरी महाराष्ट्र राज्यातील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या आरक्षणाचे धोरण त्यांना लागु नाही.]

६. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) (प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार)

७. उत्पन्नाचे प्रमाणपत्र (Income Certificate) (TFWS योजनेअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)

८. अपंगत्वाचे प्रमाणपत्र (Person with Disability) (आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)

९. संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांच्या पाल्यासाठी व अल्पसंख्यांकासाठी (Defence व Minority) इ. संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांच्या प्रवेशासाठी विहीत नमुन्यातील प्रमाणपत्रे.

१०. आधार क्रमांक व संलग्नित बँक खाते : शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती इ. योजनांची रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक.

<u>इशारा:-</u> उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही प्रमाणपत्रे जसे जात/जमात/ एसईबीसी प्रमाणपत्र, जात/जमात/ एसईबीसी वैधता प्रमाणपत्र, अनाथ प्रमाणपत्र, अपंगत्वाचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, अपंगत्वाचे प्रमाणपत्र इ. प्रमाणपत्रे सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त करून न घेता बनावट प्रकारची प्रमाणपत्रे सादर केल्याचे पडताळणीअंती आढळून आल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येतो. तरी, प्रवेशोच्छुक उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सक्षम प्राधिका-याकडूनच प्रमाणपत्रे प्राप्त करून घ्यावीत.

**टिप:-** वर नमुद केलेल्या प्रमाणपत्राबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश लागु राहतील.

वेगवेगळया वर्गवारी अंतर्गत प्रवेशासाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे व प्रवेशाबाबतची तपशीलवार माहीती प्रवेश पुस्तिकेत अंतर्भुत असते. त्याचा तपशील संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

अधिक माहितीसाठी संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांकडेही संपर्क साधता येईल.

| | |
|---|---|
| मुंबई - ०२२-२६४७४८९२, २६४७१६१९ | औरंगाबाद - ०२४०- २३३४२१६, २३३४७६९ |
| पुणे - ०२०- २५६५ ६२३४, २५६७८९७३ | अमरावती - ०७२१- २५७२५७७, २५७९२४० |
| नाशिक - ०२५३- २४६१४७९, २४६४३०० | नागपुर - ०७१२ - २५६५१४३, २५६१६६३ |

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.